
दैनिक जनप्रवास
• बुधवार, २८ जानेवारी २०२६

# युवकांनी राष्ट्र ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे

## • स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे मत

**जनप्रवास : कोल्हापूर**

देशासाठी लढणाऱ्या शूरवीरांच्या व स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाने देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्वातंत्र्य समता, बंधूभाव, एकसंघ राष्ट्र व मानवतेचा संदेश देणाऱ्या घटनेने आपल्या देशाला सामाजिक सुरक्षितता, सहिष्णूता व स्थैर्य प्राप्त करुन दिले. युवकांनी राष्ट्र ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले.



कोल्हापूर : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील ध्वजारोहणप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे. सोबत शिक्षक.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमधील ध्वजारोहण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंग कॉलेज, डॉ. बापूजी साळुंखे हॉटिल मॅनेजमेंट इन्स्टिटयूट, सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सेवानिवृत्त होणाऱ्या तसेच पीएच. डी. पदवी प्राप्त, सेट नेट परीक्षा उत्तीर्ण व पुस्तक लेखक, प्रकाशक, पेटंट प्राप्त प्राध्यापक यांचा सत्कार करण्यात आला.

पुढारी कोल्हापूर बुधवार, २८ जानेवारी २०२६

# फिडे बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेश उपविजेता



ऋषिकेश कबनुरकर

कोल्हापूर : हुबळी (कर्नाटक) केएलई टेक्निकल कॉलेज येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे प्रजासत्ताक चषक रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकर याने ९ व्या फेरीत ८ गुण मिळवून दुसरा क्रमांक पटकाविला. त्याला ३० हजार रुपये आणि चषक देण्यात आला. १८ फिडे मानांकन गुण कमाई केली. ऋषीकेश हा अनुज ॲकॅडमी दाभोळकर कॉर्नर, ताराबाई पार्क येथे सराव करतो. तो स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशन माजी सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.